भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# लोक दायित्व विमा अधिनियम, १९९१

**(सन १९९१ चा अधिनियम क्रमांक ६)**

[दिनांक ३१ मार्च, २००० रोजी यथाविद्यमान]

# The Public Liability Insurance Act, 1991

**(Act No. 6 of 1991)**

**[ As in force on the 31st March, 2000]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ५.०० ]

## प्रावकथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ मार्च, २००० रोजी यथाविद्यमान असलेला पब्लिक लायेबिलीटी इन्श्युरन्स अॅक्ट, १९९१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ११, अंक १, दिनांक २२ जून, २००० यात पृष्ठ १७ ते २४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता. आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ जून, २०००.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Public Liability Insurance Act, 1991 as on the 31st March, 2000, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part-XII, Section-1, No. 2, Volume 11, dated 22nd June, 2000 on pages 17 to 24.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 22nd June, 2000.

# लोकदायित्व विमा अधिनियम, १९९१

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. विवक्षित प्रकरणांमध्ये ना दोष तत्वावर सहाय्य देण्याचे दायित्व.

४. मालकाचे विमा पॉलिसी घेण्याबाबतचे कर्तव्य.

५. जिल्हाधिकाऱ्याने अपघाताची पडताळणी करणे व त्याला प्रसिद्धी देणे.

६. सहाय्याची मागणी करण्यासाठी अर्ज.

७. सहाय्याचे प्रदान करणे.

७क. पर्यावरण सहाय्य निधीची स्थापना.

८. मृत्यू इत्यादीच्यासाठी भरपाईची मागणी करण्यासंबंधातील इतर अधिकारांबाबत उपबंध.

९. माहिती मागविण्याची शक्ती.

१०. प्रवेश करण्याची व तपासणी करण्याची शक्ती.

११. तपासणी करण्याची व अभिग्रहणाची शक्ती.

१२. निदेश देण्याची शक्ती.

१३. धोकादायी पदार्थाची हाताळणी करण्यास मालकास विरोध करणारा अर्ज न्यायालयाकडे करण्याची शक्ती.

१४. कलम ४ च्या पोटकलम (१) चे किंवा पोटकलम (२) चे व्यतिक्रमण करण्याबद्दल किंवा कलम १२ अन्वये दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यात चुकल्याबद्दल शास्ती.

१५. कलम ९ अन्वये दिलेले निदेश किंवा कलम ११ अन्वये दिलेले आदेश याचे अनुपालन करण्यास चुकणे किंवा कोणत्याही व्यक्तीस तिची कलम १० किंवा ११ खालील कामे पार पाडण्यात अडथळा आणणे यासाठी शास्ती.

१६. कंपन्यांनी केलेले अपराध.

१७. शासकीय विभागांकडून अपराध.

१८. अपराधांची दखल.

१९. शक्तींचे प्रत्यायोजन.

२०. सद्भावपूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण देणे.

२१. सल्लागार समिती.

२२. अन्य कायद्याचे परिणाम.

२३. नियम करण्याची शक्ती.

अनुसूची.

# लोक दायित्व विमा अधिनियम, १९९१

## (१९९१ चा अधिनियम क्रमांक ६)

(३१ मार्च, २००० रोजी यथाविद्यमान)

[२२ जानेवारी, १९९१]

**कोणतेही धोकादायी पदार्थ हाताळताना घडणाऱ्या अपघातांचा परिणाम होणाऱ्या व्यक्तींना तात्काळ सहाय्य करण्याच्या प्रयोजनार्थ लोक दायित्व विम्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या एकेचाळीसाव्या वर्षी संसदेद्वारे खालीलप्रमाणे हा अधिनियम अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास "लोक दायित्व विमा अधिनियम, १९९१" असे म्हणता येईल.

(२) केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे नियम करील अशा दिनांकापासून तो अंमलात येईल.

व्याख्या.

२. ह्या अधिनियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

[1][(क) "अपघात" याचा अर्थ, कोणतेही धोकादायी पदार्थ हाताळताना आकस्मिकरीत्या, अचानक किंवा उद्देश नसताना घडलेल्या ज्या घटनेच्या परिणामी एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होण्याचा किंवा त्याला इजा पोचण्याचा किंवा कोणत्याही संपत्तीची हानी होण्याचा सतत, मधून मधून किंवा पुन: पुन: संभव निर्माण होतो अशी घटना, असा आहे, मात्र त्यात युद्धामुळे किंवा किरणोत्सारामुळे होणाऱ्या अपघाताचा समावेश होत नाही;]

(ख) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ, अपघात ज्या क्षेत्रात घडला त्या क्षेत्रावर ज्याची अधिकारिता असेल असा जिल्हाधिकारी, असा आहे;

(ग) कोणत्याही धोकादायी पदार्थासंबंधात "हाताळणे" याचा अर्थ, अशा धोकादायी पदार्थाची निर्मिती करणे, त्यावर प्रक्रिया करणे, संस्करण करणे, त्यांची पुडकी करणे, साठवण करणे, वाहनामधून त्याचे परिवहन करणे, त्याचा उपयोग करणे, संचय करणे, नाश करणे, त्यात परिवर्तन करणे, तो विक्रीसाठी देणे, त्याचे हस्तांतरण करणे किंवा यांसारख्या तत्सम क्रिया करणे, असा आहे;

(घ) "धोकादायी पदार्थ" याचा अर्थ, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९) या अन्वये धोकादायी पदार्थ म्हणून ज्याची व्याख्या करण्यात आलेली आहे आणि केंद्र सरकारने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाचा आहे असा कोणताही पदार्थ किंवा तयार केलेला सिद्ध पदार्थ, असा आहे;

(ङ) "विमा" याचा अर्थ, कलम ३, पोटकलम (१) अन्वये दायित्वाधीन असलेला विमा, असा आहे;

(च) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध होणारी अधिसूचना, असा आहे;

[2][(छ) "मालक" याचा अर्थ, अपघाताच्या वेळी जिच्या मालकीमध्ये किंवा जिच्या नियंत्रणात एखादा धोकादायी पदार्थ हाताळला जात असेल अशी व्यक्ती ; आणि

(एक) पेढीच्या बाबतीत तिचा प्रत्येक भागीदार ;

(दोन) संघटनेच्या बाबतीत तिचा प्रत्येक सदस्य ;

(तीन) कंपनीच्या बाबतीत तिचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, किंवा त्या कंपनीचा प्रत्यक्ष प्रभार जिच्याकडे असेल अशी किंवा कंपनीचा कामधंदा चालविण्यासाठी जबाबदार असेल अशी व्यक्ती, असा आहे ; ]

(ज) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखालील नियमान्वये विहित, असा आहे ;

[3][(जक) "सहाय्य निधी" याचा अर्थ, कलम ७क अन्वये स्थापन करण्यात आलेला पर्यावरण सहाय्य निधी, असा आहे ; ]

(झ) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करावयाचे नियम, असा आहे ;

(ञ) "वाहन" याचा अर्थ, रेल्वेखेरीज पृष्ठभागावरील परिवहनाचे कोणतेही साधन, असा आहे.

---

१. १९९२ चा अधिनियम ११, कलम २(एक) द्वारे मूळ खंडाऐवजी घातला (३१ जानेवारी, १९९६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (दोन) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड घातला (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २ (तीन) द्वारे मूळ खंड "ज" नंतर हा खंड घालण्यात आला (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

विवक्षित प्रकरणांमध्ये ना दोष तत्त्वावर सहाय्य देण्याचे दायित्व.

३. (१) एखाद्या अपघातामुळे (कामगाराखेरीज) अन्य कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यास किंवा तिला इजा झाल्यास किंवा कोणत्याही संपत्तीस हानी पोहोचल्यास असा मृत्यू, इजा किंवा नुकसानी याबद्दल अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार सहाय्य देण्याचे दायित्व मालकावर राहील.

(२) पोटकलम (१) खालील सहाय्यासाठीच्या कोणत्याही मागणीमध्ये (यात यापुढे या अधिनियमामध्ये सहाय्यासाठीची मागणी, असे संबोधण्यात आले आहे), मागणीदाराकडून, ज्याबाबत मागणी, करण्यात येईल तो मृत्यू, इजा, नुकसान यासंबंधात कोणत्याही व्यक्तीकडून दोषपूर्ण कृत्य घडल्यामुळे, हयगय झाल्यामुळे किंवा तिच्याकडून कसूर झाल्यामुळे अपघात घडला होता याबाबत आपली बाजू मांडण्यास आणि ती सिद्ध करण्यास मागणीदारास फर्मावण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) "कामगार" याला कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) यामध्ये जो अर्थ दिलेला असेल तोच अर्थ आहे.

(दोन) "इजा" याचा अर्थ, कोणत्याही अपघातामुळे आलेली कायमस्वरूपी किंवा कायमस्वरूपी आंशिक असमर्थता किंवा रुग्णता, असा आहे.

मालकाचे विमा पॉलिसी घेण्याबाबतचे कर्तव्य.

४. (१) प्रत्येक मालक, कोणत्याही धोकादायी पदार्थाची हाताळणी करण्यास प्रारंभ करण्यापूर्वी कलम ३ पोटकलम (१) अन्वये सहाय्य देण्याच्या दायित्वाबद्दल ज्याद्वारे विमा उतरवील अशा विमा संविदांची तरतूद असलेली विमा पॉलीसी किंवा विमा पॉलीसीज घेईल :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणताही धोकादायी पदार्थ हाताळणारा कोणताही मालक, शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत उक्त अधिनियमाच्या प्रारंभापासून एक वर्षाच्या आत अशी विमा पॉलिसी किंवा विमा पॉलिसीज् घेईल.

(२) प्रत्येक मालक, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या विमा पॉलिसीचे ज्या कालावधीपर्यंत तो धोकादायी पदार्थ हाताळतील त्या कालावधीपर्यंत त्या विमा पॉलिसीज् विधीग्राह्य राहाव्यात म्हणून विधीग्राह्यतेचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, वेळोवेळी, नवीकरण करीत राहील.

[1][(२क) ज्या उपक्रमात धोकादायी पदार्थ हाताळला जातो आणि तो उपक्रम ज्याच्या मालकीचा आहे किंवा ज्याच्या नियंत्रणाखाली आहे अशा उपक्रमाच्या मालकाने काढलेल्या किंवा नवीकरण केलेल्या विमा पॉलीसीची रक्कम ही, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, त्या उपक्रमाच्या भरणा झालेल्या भांडवलाच्या रकमेपेक्षा कमी आणि ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ "भरणा झालेले भांडवल" याचा अर्थ, एखादा मालक, कंपनी नसेल त्याबाबतीत, उपक्रमाच्या सर्व मत्ता आणि विमा संविदेच्या तारखेला उपक्रमाचा संग्रह (स्टॉक) यांचे बाजारमूल्य, असा आहे.

(२ख) कोणत्याही एका विमापत्रामधील विमाकाराचे दायित्व, त्या विमापत्रातील विमा संविदेच्या अटींमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(२ग) प्रत्येक मालक, कलम ७क अन्वये स्थापन केलेल्या सहाय्य निधीमध्ये जमा करण्यासाठी विम्याच्या हप्त्यांच्या रकमेबरोबरच विहित करण्यात येईल त्याप्रमाणे त्या हप्त्यांच्या रकमेपेक्षा अधिक नाही एवढी आणखी रक्कम, विमाकाराला देईल.

(२घ) विमाकार पोटकलम (२ग) अन्वये मालकाकडून प्राप्त झालेली रक्कम विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत, सहाय्य निधीमध्ये जमा करण्यासाठी कलम ७क पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याकडे पाठवील आणि विमाकार जर तसे करण्यात कसूर करील तर ती रक्कम विमाकाराकडून जमीन महसुलाच्या किंवा लोक मागणीच्या थकबाकीप्रमाणे वसूल केली जाईल.]

(३) केंद्र सरकार कोणत्याही मालकास पोटकलम (१) च्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल, ते मालक असे,—

(क) केंद्र सरकार;

(ख) कोणतेही राज्य शासन;

(ग) केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्या मालकीचे किंवा त्यांच्या नियंत्रणाधीन असलेले निगम; किंवा

(घ) कोणतेही स्थानिक प्राधिकरण:

परंतु असे की, कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये कोणतेही दायित्व भागविण्यासाठी करण्यात आलेल्या नियमांनुसार त्या मालकाने, एखादा निधी उभारलेला नसेल आणि ठेवला नसेल तर, अशा मालकाच्या बाबतीत असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

---

१. १९९२ चा अधिनियम ११, कलम ३ द्वारे ही पोटकलमे नव्याने घातली (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

५. जेव्हा जिल्हाधिकाऱ्याला आपल्या अधिकारितेतील कोणत्याही ठिकाणी अपघात घडल्याचे निदर्शनास येईल तेव्हा तो असा अपघात घडला असल्याची पडताळणी करील आणि कलम ६ च्या पोटकलम (१) खालील अर्ज मागवण्यासाठी योग्य वाटेल अशारीतीने प्रसिद्धी देण्याची व्यवस्था करील. जिल्हाधिकाऱ्याने अपघाताची पडताळणी करणे व त्याला प्रसिद्धी देणे.

६. (१) सहाय्याची मागणी करण्यासाठी,— सहाय्याची मागणी करण्यासाठी अर्ज.

(क) जिला इजा झाली आहे अशा व्यक्तीला ;

(ख) ज्या संपत्तीचे नुकसान झाले आहे अशा संपत्तीच्या मालकाला ;

(ग) अपघातामुळे मृत्यू झाला असेल अशा बाबतीत मृत व्यक्तीच्या सर्व किंवा कोणत्याही वैध प्रतिनिधींना, किंवा

(घ) यथास्थिति, अशा व्यक्तीने किंवा अशा संपत्तीचा मालक किंवा अशा मृत व्यक्तीच्या सर्व किंवा कोणत्याही वैध, प्रतिनिधींना प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अभिकर्त्याला अर्ज करता येईल :

परंतु, सहाय्य मिळण्याबाबतचा असा अर्ज मृत व्यक्तीच्या सर्व वैध, प्रतिनिधींनी एकत्रितरीत्या केलेला नसेल त्याबाबतीत असा अर्ज मृत व्यक्तीच्या सर्व वैध प्रतिनिधींच्यावतीने किंवा त्यांच्या फायद्यासाठी करण्यात येईल आणि जे वैध प्रतिनिधी अशा रीतीने एकत्रित आलेले नसतील त्यांना त्या अर्जाच्या बाबतीत उत्तरवादी म्हणून खटला चालवण्यात येईल.

(२) पोटकलम (१) खालील अर्ज जिल्हाधिकाऱ्याकडे आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात करण्यात येईल, आणि त्यासोबत विहित करण्यात येईल असा तपशील त्यात अंतर्भूत असेल आणि त्यासोबत विहित करण्यात येतील असे दस्तऐवज असतील.

(३) अपघात घडल्यापासून पाच वर्षांच्या आत सहाय्यासाठी अर्ज करण्यात आला नसेल तर, त्याचा विचार केला जाणार नाही.

७. (१) कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये करण्यात आलेला अर्ज मिळाल्यावर, जिल्हाधिकारी, तो मालकाला अर्जाबाबतची सूचना देऊन आणि पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन मागणीच्या बाबतीत किंवा मागण्यांपैकी प्रत्येक मागणीच्या बाबतीत चौकशी करू शकेल आणि न्याय्य वाटेल त्यानुसार सहाय्याची रक्कम ठरवून आणि अशी रक्कम कोणास द्यावयाची ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती विनिर्दिष्ट करून निवाडा करू शकेल. सहाय्याचे प्रदान करणे.

(२) जिल्हाधिकारी निवाड्याच्या प्रती संबंधित पक्षकारांना शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत निवाड्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत संबंधित पक्षकारांना मिळाव्यात अशा रीतीने पाठवण्याची व्यवस्था करील.

[1][ (३) जेव्हा या कलमान्वये एखादा निवाडा करण्यात येईल तेव्हा,—

(क) निवाड्याच्या अटींनुसार आणि कलम ४ च्या पोटकलम (२ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत रक्कम जमा करण्यास ज्यास फर्मावण्यात आले असेल असा विमाकार, निवाडा जाहीर झाल्यापासून तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी निदेश देईल त्या रीतीने ती रक्कम जमा करील ;

(ख) जिल्हाधिकारी, निवाड्यानुसार आणि कलम ७क अन्वये तयार केलेल्या योजनेस अनुसरून, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना, त्या योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम सहाय्य निधीमधून देण्याची व्यवस्था करील ;

(ग) मालक, जिल्हाधिकारी निदेश देईल त्या रीतीने व त्या कालावधीत अशी रक्कम जमा करील.]

(४) जिल्हाधिकारी, पोटकलम (१) खालील कोणतीही चौकशी करताना याबाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने त्याला योग्य वाटेल अशा संक्षिप्त कार्यपद्धतीचा अवलंब करू शकेल.

(५) जिल्हाधिकाऱ्याला शपथेवर पुरावा घेणे व साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडणे आणि शोध घेण्यास भाग पाडणे, दस्तऐवज व महत्त्वाची माहीती हजर करणे या गोष्टींसाठी आणि विहित करण्यात येतील अशा अन्य प्रयोजनासाठी दिवाणी न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम १९५ आणि प्रकरण सव्वीसच्या सर्व प्रयोजनांसाठी जिल्हाधिकारी हा दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

(६) ज्याच्या विरुद्ध पोटकलम (१) अन्वये निवाडा देण्यात आला असेल तो विमाकार किंवा मालक पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत अशा निवाड्याची रक्कम जमा करण्यास चुकेल त्याबाबतीत अशी रक्कम अशा मालकाकडून किंवा यथास्थिति विमाकाराकडून जमीन महसुलाची किंवा लोक मागणीची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

---

१. १९९२ चा अधिनियम ११, कलम ४ (क) द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी घालण्यात आले (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

(७) कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा तिला झालेली इजा किंवा संपत्तीची हानी या संबंधातील सहाय्यासाठीची मागणी शक्य तितक्या शीघ्रतेने निकालात काढण्यात येईल आणि कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये सहाय्याची मागणी करण्यासाठी केलेला अर्ज मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत तो निकालात काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करील.

[1][ (८) जर एखादा मालक निवाड्याची रक्कम देण्याचे टाळण्याच्या उद्देशाने आपली संपत्ती हलवण्याची किंवा विकण्याची शक्यता असेल तर, जिल्हाधिकारी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या पहिल्या अनुसूचीचा आदेश क्रमांक ३९ याच्या नियम १ ते ४ च्या उपबंधांना अनुसरून असे कृत्य करू नये म्हणून अस्थायी व्यादेश देऊ शकेल.]

[2][**पर्यावरण सहाय्य निधीची स्थापना.** ७क. (१) केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे, पर्यावरण सहाय्य निधी या नावाने ओळखण्यात येणारा एक निधी स्थापन करू शकेल.

(२) सहाय्य निधीचा उपयोग या अधिनियमाच्या उपबंधास अनुसरून आणि पोटकलम (३) खाली तयार करण्यात आलेल्या योजनेस अनुसरून, जिल्हाधिकाऱ्याने कलम ७ अन्वये दिलेल्या निवाड्याखालील सहाय्य देण्यासाठी करण्यात येईल.

(३) केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे, एक योजना तयार करील व तीद्वारे, विनिर्दिष्ट करेल की, सहाय्य निधी कोणत्या प्राधिकरणाकडे निहित होईल, सहाय्य निधीचे व्यवस्थापन कोणत्या रीतीने केले जाईल, सहाय्य निधीमधून पैसा कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने काढण्यात येईल आणि संबंधित इतर सर्व बाबी किंवा सहाय्य निधीच्या व्यवस्थापनाशी आणि त्यामधून मिळणाऱ्या सहाय्याच्या प्रदानाशी संबंधित किंवा आनुषंगिक सर्व बाबी विनिर्दिष्ट करील.]

**मृत्यू इत्यादींच्यासाठी भरपाईची मागणी करण्यासंबंधातील इतर अधिकारांबाबत उपबंध.** ८. (१) कलम ३, पोटकलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा तिला झालेली इजा किंवा कोणत्याही संपत्तीची हानी याबाबत सहाय्याची मागणी करण्याचा अधिकार हा, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये इतर कोणत्याही भरपाई संबंधातील मागणीच्या अधिकाराशिवाय आणखी असेल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा तिला झालेली इजा किंवा कोणत्याही संपत्तीची हानी यासंबंधातील सहाय्याची मागणी पूर्ण करण्यास दायी असलेला मालक इतर कोणत्याही कायद्यान्वये भरपाई देण्यास देखील दायी असेल त्याबाबतीत अशा भरपाईच्या रकमेमधून या अधिनियमान्वये द्यावयाची सहाय्याची रक्कम वजा करण्यात येईल.

**माहिती मागविण्याची शक्ती.** ९. केंद्र सरकारने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, ह्या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमांच्या किंवा ह्या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या निदेशांच्या कोणत्याही आवश्यक गोष्टींची पूर्तता करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, तिला वाजवी रीत्या आवश्यक वाटेल अशी माहिती तिच्याकडे सादर करण्यास कोणत्याही मालकास फर्मावू शकेल.

**प्रवेश करण्याची व तपासणी करण्याची शक्ती.** १०. केंद्र सरकारने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा ह्या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या निदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यात येत आहे किंवा पालन करण्यात आले आहे किंवा कसे हे निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी जेथे धोकादायी पदार्थ हाताळला जातो अशा कोणत्याही जागेत, आवारात किंवा वाहनात तिला आवश्यक वाटेल असे सहाय्य घेऊन सर्व वाजवी वेळी प्रवेश करण्याची शक्ती असेल आणि अशा व्यक्तीला सर्व प्रकारचे सहाय्य करणे मालकास बंधनकारक असेल.

**तपासणी करण्याची व अभिग्रहणाची शक्ती.** ११. (१) केंद्र सरकारने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीस जर, कोणताही धोकादायी पदार्थ कोणत्याही जागेत, आवारात किंवा वाहनात कलम ४, पोटकलम (१) चे उल्लंघन करून हाताळला जात आहे असे सकारण वाटत असेल तर ती व्यक्ती अशा जागेत किंवा आवारात किंवा वाहनात प्रवेश करू शकेल व धोकादायी पदार्थाच्या अशा हाताळणीचा शोध घेऊ शकेल.

(२) तिच्या बाबतीत कलम ४, पोटकलम (१) अन्वये शोध घेतल्यामुळे पोटकलम (१) चे व्यतिक्रमण झाले असल्याचे आढळून आले असेल अशा कोणत्याही धोकादायी पदार्थाच्या हाताळणीच्या बाबतीत ती व्यक्ती, असा धोकादायी पदार्थ व तिच्या मते या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत उपयुक्त ठरतील किंवा कार्यवाहीशी संबंधित असतील अशा इतर कोणत्याही वस्तू जप्त करू शकेल :

---

१. १९९२ चा अधिनियम ११, कलम ४ (ख) द्वारे नवीन पोटकलम घालण्यात आले (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे नवीन कलम ७क घालण्यात आले (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

परंतु, असा कोणताही धोकादायी पदार्थ किंवा इतर वस्तू जप्त करणे व्यवहारी नसेल अशा बाबतीत ती व्यक्ती मालकाने असे धोकादायी पदार्थ व अन्य पदार्थ वस्तू त्या व्यक्तीच्या पूर्वानुमतीखेरीज तेथून हलवू नयेत, वेगळया करू नयेत किंवा त्यांची अन्यथा देवघेव करू नयेत असा आदेश त्या मालकावर बजावू शकेल.

(३) अपघात टाळण्याच्या दृष्टीनें तसे करणे इष्ट आहे असे त्या व्यक्तीस सकारण वाटत असेल तर ती व्यक्ती, पोटकलम (२) खाली जप्त केलेल्या धोकादायी पदार्थांची तिला योग्य वाटेल अशा रीतीने तात्काळ विल्हेवाट लावू शकेल.

(४) पोटकलम (३) अन्वये धोकादायी पदार्थांची विल्हेवाट लावण्यासाठी करण्यात आलेला सर्व खर्च जमीन महसुलाची किंवा लोक मागणीची थकबाकी म्हणून मालकाकडून वसूल करण्यात येईल.

**निदेश देण्याची शक्ती.**

१२. अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, ह्या अधिनयमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, केंद्र सरकार, ह्या अधिनियमाच्या खालील त्याच्या शक्तीचा वापर करताना व त्याची कामे पार पाडताना या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी त्याला योग्य वाटतील असे लेखी निदेश कोणताही मालक किंवा कोणतीही व्यक्ती, अधिकारी, प्राधिकारी किंवा अभिकर्ता याला देऊ शकेल आणि असा मालक, व्यक्ती, अधिकारी, प्राधिकारी किंवा अभिकर्ता यांना अशा निदेशाचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

**स्पष्टीकरण.**––शंकानिरसनार्थ, याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, या कलमाखालील निदेश देण्याच्या शक्तीमध्ये,––

(क) कोणत्याही धोकादायी पदार्थाच्या हाताळणीस प्रतिबंध करणे किंवा त्याचे विनियमन करणे ; किंवा

(ख) वीज, पाणी किंवा इतर कोणत्याही सेवेचा पुरवठा थांबवणे किंवा त्याचे विनियमन करणे,

––या गोष्टींबाबत निदेश देण्याच्या शक्तींचाही समावेश असेल.

**धोकादायी पदार्थाची हाताळणी करण्यास मालकास विरोध करणारा अर्ज न्यायालयाकडे करण्याची शक्ती.**

१३. (१) कोणत्याही मालकाने, कोणत्याही धोकादायी पदार्थाची हाताळणी ह्या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करून केली आहे असे वाटण्यास केंद्र सरकारचा किंवा त्या शासनाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस तसे समजण्यास कारण असेल तर ते शासन किंवा, यथास्थिति, त्या व्यक्ती, महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचा नसेल अशा दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात अशा मालकाकडून होणाऱ्या अशा हाताळणीसंबंधात विरोध करण्यासाठी अर्ज करू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली केलेला अर्ज प्राप्त झाल्यावर न्यायालयात त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (२) अन्वये न्यायालय धोकादायी पदार्थाच्या हाताळणीबाबत कोणत्याही मालकाला विरोध करणारा आदेश देईल त्याबाबतीत, ते न्यायालय आदेशामध्ये,––

(क) अशा हाताळणीपासून अशा मालकांना परावृत्त होण्यासाठी निदेश देऊ शकेल.

(ख) ज्याला निदेश देण्यात आलेला आहे अशा मालकाने खंड (क) खालील अशा निदेशांचे पालन केले नसेल तर, न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा रीतीने अशा निदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करू शकेल.

(४) न्यायालयाच्या पोटकलम (३) च्या खंड (ख) खालील निदेशांची अंमलबजावणी करताना, केंद्र सरकारने किंवा यथास्थिति व्यक्तीने केलेला खर्च जमीन महसुलाची किंवा लोक मागणीची थकबाकी म्हणून मालकाकडून वसूल करण्यात येईल.

**कलम ४ च्या पोटकलम (१) चे किंवा पोटकलम (२) चे व्यतिक्रमण करण्याबद्दल किंवा कलम १२ अन्वये दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यात चुकल्याबद्दल शास्ती.**

१४. (१) जो कोणी कलम ४ च्या [1][पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) किंवा पोटकलम (२क) किंवा पोटकलम (२ग) ] च्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील किंवा कलम १२ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यात चुकेल तो एक वर्ष व सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल. परंतु सहा वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) पोटकलम (१) अन्वये यापूर्वीच एखाद्या अपराधाबद्दल सिद्धापराधी ठरवण्यात आलेला जो कोणी दुसऱ्या अपराधाबद्दल किंवा दुसऱ्या अपराधानंतरच्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराधी ठरला असेल तर तो दोन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या आणि एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

---

१. १९९२ चा अधिनियम ११, याचे कलम ६ द्वारे हा मजकूर घालण्यात आला (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या कलम ३६० मधील किंवा अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) यामधील कोणतीही गोष्ट जिच्या बाबतीत या अधिनियमाखालील अपराध सिद्ध झाला असेल अशा व्यक्तीस लागू होणार नाही, मात्र अशा व्यक्तीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असेल तर अलाहिदा.

कलम ९ अन्वये दिलेले निदेश किंवा कलम ११ अन्वये दिलेले आदेश याचे अनुपालन करण्यास चुकणे किंवा कोणत्याही व्यक्तीस तिची कलम १० किंवा ११ खालील कामे पार पाडण्यात अडथळा आणणे याशाठी शास्ती.

१५. कोणताही मालक, कलम ९ अन्वये देण्यात आलेल्या निदेशाचे किंवा कलम ११ च्या पोटकलम (२) अन्वये देण्यात आलेल्या आदेशांचे अनुपालन करण्यास चुकेल किंवा कोणत्याही व्यक्तीस तिची कामे किंवा कलम १० किंवा कलम ११ च्या पोटकलम (१) किंवा (३) खालील कामे पार पाडण्यात अडथळा आणील तर तो तीन महिन्यापर्यंत असू शकेल अशा कारावासाच्या किंवा दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

१६. (१) या अधिनियमाखालील कोणताही अपराध एखाद्या कंपनीकडून घडला असेल त्या बाबतीत कंपनीकडून अपराध घडला त्यावेळेस कंपनीचा प्रभार प्रत्यक्षात जिच्याकडे होता व कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी जी कंपनीला जबाबदार होती अशी व्यक्ती प्रत्येक व्यक्ती तसेच ती कंपनी अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाईल व त्यानुसार शिक्षा ठोठावण्यास पात्र असेल :

परंतु, असा अपराध आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे वाजवी तत्परता दाखविली होती असे जर कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे ह्या अधिनियमान्वये कंपनीकडून एखादा अपराध घडला असेल आणि कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या सहमतीने किंवा मुकानुमतीने अपराध घडलेला आहे असे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत असा संचालक ,व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा ठोठावण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमांच्या प्रयोजनासाठी—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यामध्ये भागीदारी संस्था किंवा इतर व्यक्तीसंघाचा अंतर्भाव होतो.

(ख) भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेमधील भागीदार, असा आहे.

शासकीय विभागांकडून अपराध.

१७. शासकीय विभागाकडून या अधिनियमाखालील अपराध करण्यात आलेला असेल त्याबाबतीत, विभाग प्रमुख हा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार त्याला शिक्षा ठोठावण्यास तो पात्र असेल:

परंतु, ह्या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, विभागप्रमुखाने अपराध जाणीवपूर्वक केलेला नाही किंवा असा अपराध घडू नये म्हणून त्याने वाजवी तत्परता घेतली होती असे सिद्ध केल्यास, अशा विभाग प्रमुखास शिक्षेस पात्र ठरवण्यात येणार नाही.

अपराधांची दखल.

१८. (क) केंद्र सरकार किंवा कोणतेही प्राधिकरण किंवा त्याबाबतीत शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी; किंवा

(ख) ज्या कोणत्याही व्यक्तीने, केंद्र सरकारकडे किंवा पूर्वोक्तप्रमाणे प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणाकडे किंवा अधिकाऱ्याकडे अभिकथित अपराधाबाबत व तक्रार करण्याच्या उद्देशाबाबत साठ दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या मुदतीची नोटीस दिली आहे अशी व्यक्ती,

यांच्याखेरीज अन्य कोणीही, ह्या अधिनियमाखालील अपराधाबाबत केलेल्या तक्रारीची दखल न्यायालय घेणार नाही.

शक्तीचे प्रत्यायोजन.

१९. केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या व अटींच्या अधीनतेने, कोणत्याही व्यक्तीस, ह्या अधिनियमखालील त्याला आवश्यक व इष्ट वाटतील अशा, त्याच्या (कलम २३ खालील शक्ती खेरीज करून) शक्ती व कार्य कोणत्याही व्यक्तीस (कोणत्याही अधिकारी, प्राधिकारी किंवा इतर अभिकर्ता यांच्यासकट) प्रदान करू शकेल.

२०. ह्या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखालील नियमांच्या किंवा त्याअन्वये देण्यात आलेल्या आदेशांच्या किंवा निदेशांच्या अनुसार केलेल्या किंवा करावयाचे योजिलेल्या कोणत्याही सद्भावपूर्वक कृतीबद्दल शासन किंवा व्यक्ती, अधिकारी, प्राधिकारी किंवा अन्य अभिकर्ता यांच्याविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही. सद्भावपूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण देणे.

२१. (१) केंद्र सरकार, वेळोवेळी या अधिनियमाखालील विमा पॉलिसीच्या संबंधातील बाबींसाठी एक सल्लागार समिती घटित करील. सल्लागार समिती.

(२) सल्लागार समिती केंद्र सरकारने नियुक्त करावयाच्या पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल,—

(क) केंद्र सरकारचे प्रतिनिधी म्हणून तीन अधिकारी;

(ख) विमाकाराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती; आणि

(ग) मालकाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती; आणि

(घ) विमा किंवा धोकादायी पदार्थ यातील तज्ञांमधून दोन व्यक्ती.

(३) केंद्र सरकारकडून नामनिर्देशित करण्यात येईल असा त्या शासनाच्या प्रतिनिधींपैकी एक सदस्य हा सल्लागार समितीचा अध्यक्ष असेल.

२२. ह्या अधिनियमाचे व त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचे उपबंध हे, इतर कोणत्याही कायद्यात याबाबत काहीही विसंगत असे अंतर्भूत असले तरी, प्रभावी राहतील. अन्य कायद्याचे परिणाम.

२३. (१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, ह्या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा काही बाबींसाठी उपबंध करता येतील त्या अशा,—

[१][(क) कलम ४ च्या पोटकलम (२क्) अन्वये एखाद्या मालकास ज्या रकमेची विमा पॉलिसी घेता घेईल ती कमाल रक्कम ;

(कक) कलम ४ च्या पोटकलम (२ग्) अन्वये प्रत्येक मालकाने सहाय्य निधीमध्ये जमा करणे आवश्यक असेल ती रक्कम ;

(कख्) कलम ४ च्या पोटकलम (२घ्) अन्वये विमाकाराने मालकाकडून प्राप्त झालेली रक्कम ज्या रीतीने व ज्या कालावधीत प्रेषित करावयाची ती रीत व तो कालावधी ;]

[२][(कग्)] कलम ४ च्या पोटकलम (३) अन्वये निधीची स्थापना करणे व तो ठेवणे ;

(ख्) कलम ६ च्या पोटकलम (२) अन्वये अर्जाचा नमुना, त्यात भरावयाचा तपशील आणि अशा अर्जासोबत जोडावयाचे दस्तऐवज ;

(ग्) कलम ७ च्या पोटकलम (४) अन्वये करावयाच्या चौकशीबाबतची कार्यपद्धती ;

(घ्) कलम ७ च्या पोटकलम (५) अन्वये जिल्हाधिकाऱ्याला ज्या प्रयोजनासाठी दिवाणी न्यायालयाच्या शक्ती असतील ती प्रयोजने ;

(ङ्) कलम १८ च्या खंड (ख्) अन्वये केंद्र सरकारला अपराधाची व तक्रार करण्याच्या उद्देशाची नोटीस ज्या रीतीने द्यावयाची ती रीत ;

(च्) बाबी विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखालील केलेला प्रत्येक [३][नियम किंवा योजना], ती करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या, लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या [३][नियमात किंवा योजनेत] कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो [३][नियम किंवा योजना] करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो [३][नियम किंवा योजना] अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या [३][नियमाखाली किंवा योजनेखाली] करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाधा येणार नाही.

---

१. १९९२ चा अधिनियम ११, कलम ७(क्) (दोन) द्वारे नव्याने क्रमांक दिलेल्या खंड (कग्) पूर्वी हे खंड घालण्यात आले (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७(क्) द्वारे मूळ खंड (क्) ला खंड (कग्) असा नव्याने क्रमांक दिला. (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ (ख्) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला (३१ जानेवारी, १९९२ रोजी व तेव्हापासून).

## अनुसूची

कलम ३ (१) पहा.

(एक) प्रत्येक प्रकरणामध्ये करण्यात आलेल्या कमाल रुपये १२,५०० एवढया रकमेपर्यंतच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती.

(दोन) अपघातग्रस्त व्यक्तीवर उपरोक्त कमाल रुपये १२,५०० एवढया रकमेपेक्षा अधिक वैद्यकीय खर्च करण्यात आला असल्यास, अशा प्राणांतक अपघाताबद्दल प्रत्येक व्यक्तीसाठी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीव्यतिरिक्त रुपये २५,००० एवढया रकमेचे सहाय्य देण्यात येईल.

(तीन) कायमस्वरूपी संपूर्ण किंवा कायम स्वरूपी आंशिक विकलांगता किंवा अन्य इजा किंवा रुग्णता यांसाठी पुढीलप्रमाणे सहाय्य देण्यात येईल :—

(क) प्रत्येक प्रकरणात कमाल रुपये १२,५०० पर्यंतच्या रकमेपेक्षा अधिक झालेला वैद्यकीय खर्च, कोणताही असल्यास, त्याची प्रतिपूर्ति ; आणि

(ख) प्राधिकृत भिषकाने प्रमाणित केलेल्या विकलांगतेच्या टक्केवारीच्या आधारे रोख सहाय्य. संपूर्ण स्वरूपी विकलांगतेबद्दल रुपये २५,००० एवढया रकमेचे सहाय्य देण्यात येईल.

(चार) बळी पडलेल्या ज्या व्यक्तीच्या तात्पुरत्या आंशिक विकलांगतेमुळे तिची कमावण्याची क्षमता कमी झाली असेल त्या व्यक्तीच्या बाबतीत वेतनाच्या हानीबद्दल कमाल ३ महिन्यांपर्यंत दरमहा रुपये १,००० पेक्षा अधिक नाही एवढे मासिक नियम सहाय्य, मात्र बळी पडलेली व्यक्ती १६ वर्षांपेक्षा अधिक असावी आणि ३ दिवसांहून अधिक मुदतीसाठी तिला रुग्णालयात ठेवलेले असावे ;

(पाच) खाजगी संपत्तीच्या कोणत्याही हानीसाठी प्रत्यक्षात झालेल्या हानीच्या आधारे रुपये ६,००० पर्यंत सहाय्य देण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई